Government Of Maharashtra
महाराष्ट्र शासन
Office of the Joint Director of Industries (Mumbai Metropolitan Region)
उद्योग सह संचालक (मुंबई प्राधिकरण विभाग) यांचे कार्यालय,
Vikas Centre, 702, 7th Floor, Dr. C.G.Marg, Near Basant Cinema, Chembur (East), Mumbai. 400074.
विकास सेंटर, ७०२, ७ वा मजला, डॉ. सी.जी.मार्ग, बसंत सिनेमागृहाजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई. ४०००७४.
दूरध्वनी क्रमांक २५२०६१९९/२५२०८१८२
Email:-didic.mumbai@maharashtra.gov.in

दिनांक :- ०६.०२.२०२३.

## :- मुंबई उपनगर निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक दिनांक २५.११.२०२२ चे इतिवृत्त -:

मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन समिती गठीत करण्याबाबत, शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक निप्रप-२०२०/ प्र.क्र. २८/ उद्योग-७, दिनांक १९.१०.२०२० मध्ये निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार मुंबई उपनगराकरिता निर्यात प्रचालन समितीची स्थापना करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांची मान्यता घेऊन तसे समिती सदस्य यांना कळविण्यात आले आहे. राज्यातील निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने व उद्योजकांना येणा-या अडचणीचे निराकरण करण्याकरिता तसेच जिल्हयातील निर्यातवाढीसाठी विविध केंद्र व जिल्हा कार्यालये, औद्योगिक संघटना, निर्यात परिषदा, निर्यात सल्लागार इ. यांच्याशी सातत्याने पाठपुरावा, समन्वय व अडीअडचणी दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेस सहाय्य करण्यासाठी एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनाकरिता मुंबई उपनगराकरिता उपक्रम राबविण्याबाबत जिल्हा निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक मा उपजिल्हाधिकारी, सामान्य प्रशासन यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २५.११.२०२२ रोजी दुपारी ०४.३० वाजता मा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय, प्रशासकीय भवन, १ वा माळा, वांद्रे (पूर्व), मुंबई. ४०० ०५१. येथे संपन्न झाली.

१. सर्वप्रथम सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती यांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत करुन निर्यात प्रचालन समिती संदर्भात मुंबई उपनगर जिल्हयाकरिता स्थापन करण्यात आलेल्या निर्यात प्रचालन समिती अंतर्गत करण्यात येणा-या कार्यवाहीबाबत एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनाकरिता मुंबई उपनगराकरिता उपक्रम राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रस्तावित निर्यात प्रचालन कृती आराखडाबाबत बदल अथवा सूचना तसेच निर्यातसंबंधी काही अडचणी असल्यास त्याबाबत कळविण्याबाबत निर्देश दिले.

२. बैठकीसाठी उपस्थित प्रतिनिधी यांनी विषयासंदर्भात खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले.

| क्रमांक | प्रतिनिधी | उपस्थित केलेले मुद्दे |
|---|---|---|
| १. | मा. संचालक, विदेश व्यापार महानिदेशालय, | जिल्हा निर्यात प्रचलनाबाबत आवश्यक कार्यवाहीमध्ये One District One Product (ODOP) बाबत निर्णय घेणे तसेच एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनाकरिता मुंबई शहराकरिता उपक्रम राबविण्याबाबत योग्य ते सहाकार्य करण्याबाबत DGFT यांचे उपस्थित प्रतिनिधी यांनी समितीस कळविले. |

| | | |
|---|---|---|
| २. | मा. जिल्हा अग्रणी व्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया, | जिल्हा अग्रणी व्यवस्थापक यांनी मा सदस्य सचिव यांचेसोबत Flated Industrial Gala Policy, MSME Policy, Scrap Policy, Ties Policy, Export Award and GI Mapping of ODOP Product या विषयावर चर्चा करुन त्याबाबत योग्य ते सहकार्य करण्याबाबत मान्य केले. |
| ३. | भारतीय निर्यात संस्था फेडरेशन, (एफआयईओ), | भारतीय निर्यात संस्था फेडरेशन, (एफआयईओ), टाईम्स स्क्वेअर यांचेकडून निर्यातीमध्ये संबंधित असणाऱ्या स्टेक होल्डर यांचेकरिता निर्यात प्रोत्साहन परिषद, जिल्हा उद्योग केंद्र तसेच भारतीय निर्यात संस्था फेडरेशन यांचे समवेत एकत्रितपणे निर्यातदारांकरिता चर्चासत्र आयोजित करणे त्याकरिता त्यांचेकडील असलेल्या सोयीसुविधासह योग्य ते सहकार्य करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले |
| ४. | संचालक, लेदर एक्सपोर्ट कौन्सिल, | लेदर उद्योगाच्या निर्यातवाढीसाठी, क्षमतावृध्दीसाठी प्रयत्न करण्याबाबत तसेच निर्यातीबाबत प्रदर्शन भरविण्याबाबत व त्याकरिता जागा उपलब्ध करुन देण्याबबात सुचविण्यात आले. त्याबाबत काही अडचणी असल्यास तसे या कार्यालय लेखी कळविण्याबाबत सांगण्यात आले. निर्यातपदधती बाबत नवीनतम तंत्रज्ञान व कौशल्ये तयार करुन त्याकरिता समिती सदस्य यांनी चर्चासत्र आयोजित करुन निर्यातवाढीकरिता प्रयत्न करण्याबाबत सुचविण्यात आले. |
| ५. | सचिव, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर | निर्यातदार यांना निर्यातीकरिता येणाऱ्या अडचणीबाबत जिल्हा वस्तू व सेवाकर कार्यालय यांचेकडून निराकरण करणे, तसेच निर्यातदारांकरिता NSIC योजनेबाबतचे सादरीकरण करण्याबाबत सुचविण्यात आल |
| ६. | संचालक, सागरी उत्पादन निर्यातक | एक जिल्हा एक उत्पादन या सदराखाली खाद्य मेळावा तसेच जहाज मेळावा आयोजन करणे, तसेच आंतरराष्ट्रीय खरेदीदार व विक्रेते यांचेकरिता कार्यशाळा आयोजन करण्याबाबत सुचविण्यात आले. |

प्रस्तावित निर्यात प्रचालन समिती बैठकीमध्ये मुंबई उपनगर कार्यवाही होण्याकरिता मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनाकरिता मुंबई उपनगराकरिता उपक्रम राबविण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच सदर समिती अंतर्गत निर्यातीसंदर्भात बैठकीस उपस्थित असलेल्या संस्थेस तसेच इतर अन्य संस्थेस काही अडचणी असल्यास त्याचे निराकरण करणे व त्याबाबत लेखी स्वरुपात माहिती उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई कार्यालयास सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच संशोधन व विकास विभागांतर्गत कौशल्य व विकासांतर्गत निर्यातवृध्दीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्याबाबत निर्देश देण्यात आले.

सभेअंती सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे जाहिर करण्यात आले.

उद्योग उप संचालक (मुंप्रावि) तथा
सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती

मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तथा अध्यक्ष
जिल्हा निर्यात प्रचालन समिती करिता

- **बैठकीस उपस्थित कार्यबल समिती सदस्य :-**

| | |
|---|---|
| १. | मा. निवासी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तथा अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई उपनगर, मुंबई. |
| २. | उद्योग उप संचालक (मुंप्रावि) तथा सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई शहर, मुंबई. |
| ३. | मा. संचालक, विदेश व्यापार महानिदेशालय, सी.जी.ओ न्यु बिल्डींग, साऊथ ईस्ट विंग, मरीन लाईन्स, मुंबई. |
| ४. | जिल्हा अग्रणी व्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया,बँक ऑफ इंडिया बिल्डिंग, २ रा मजला, नटराज मार्केटसमोर, एस.व्ही.रोड, मालाड (पश्चिम), मुंबई. |
| ५. | संचालक, सागरी उत्पादन निर्यातक, योगक्षेम, फ्लॅट क्रमांक ६०५, रिजेन्ट चेंबर्स, ६ वा मजला, जमनालालउ बजाज रोड, नरीमन पॉईट, मुंबई. |
| ६. | भारतीय निर्यात संस्था फेडरेशन, (एफआयईओ), टाईम्स स्क्वेअर, युनिट क्रमांक ३-ए, बी विंग, ४ था मजला, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई. |
| ७. | सचिव, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर, ओरीकन हाऊस, ६ वा मजला, ४ दुभाष रोड, फोर्ट, मुंबई. |
| ८. | संचालक, लेदर एक्सपोर्ट कौन्सिल, प्लॉट क्रमांक ए-४१, विनमार हाऊस, एस.एफ.रोड क्रमांक २, एमआयडीसी, अंधेरी (पूर्व), मुंबई. |

क्रमांक उससं/मुंप्रावि//मुंबई[illegible]/जिनिप्रस/बैठक/२०२३/ 627 दिनांक :- 9/2/2023

प्रत माहितीस्तव सादर :-

१. मा जिल्हाधिकारी, मुंबई शहर
२. बैठकीस उपस्थित कार्यबल समिती सदस्य, मुंबई शहर.